# श्री सिद्धेश्वर विद्या प्रशालेत सायबर सुरक्षेवर जनजागृती कार्यक्रम संपन्न



मंगळवेढा (प्रतिनिधी) : श्री सिद्धेश्वर विद्या मंदिर,माचणूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील विद्यार्थिनी तृप्ती पवार व तेजश्री पवार यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकी बद्दल उदहरणाद्वरे माहिती दिली. फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा त्यासाठी ओटीपी कोणाला सांगू नये,अनोळखी नंबर वरून आलेले फोन पडताळणी करून घ्यावी,व्हॉट्सअँप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतर पुढील प्रक्रिया करावी. त्यासाठी मोबाईल,कॉम्प्युटर,लॅपटॉप इत्यादी संधनावर अधिकृत अँटीव्हायरस च वापर करावा असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक खांडेकर टी.ल. होते.यावेळी महेंद्र पुजारी पुजारी व माजी विद्यार्थीनी मानसी पाटील यांनी मार्गदर्शन केले.